## सर्व शिक्षा अभियान

# महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र




### उद्दिष्टे :-

- ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांना शिक्षणाची संधी देणे,
- शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल करणे,
- मुलांच्या सोयीनुसार व वेळेनुसार शिक्षण उपलब्ध करुन देणे.

### योजना कोणासाठी :-

- ६ ते १४ वयोगटातील शाळा सोडलेली सर्व मुले,
- जी मुले कधी शाळेतच गेली नाहीत,
- जी मुले नियमित शाळेत शिक्षण घेऊ शकत नाहीत,
- स्थलांतरीत कामगारांच्या मुलांसाठी,
- वंचित घटकातील मुलांसाठी.

### योजनेची अंमलबजावणी :-

प्राधान्यने स्थानिक स्वराज्य संस्था - जर स्थानिक स्वराज्य संस्था केंद्र काढण्यास तयार नसेल व तसे लेखी दिले असेल तर - पंजीकृत स्वयंसेवी संस्था / पंजीकृत शिक्षण संस्था.

### केंद्र स्वरुप व विद्यार्थी संख्या :-

- ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांसाठी केंद्र सुरु करता येईल,
- विद्यार्थी संख्या - ११ ते २० मुलांसाठी केंद्र सुरु करता येते. २० पेक्षा अधिक असल्यास २५ मुलांपर्यंत त्याच केंद्रात सामावून घेतले जाते.
- २५ पेक्षा अधिक असल्यास दुसरे केंद्र उघडता येते.

### कालावधी :-

- केंद्र शैक्षणिक वर्षात केव्हाही सुरु करता येते. प्राथमिक केंद्रासाठी कालावधी दररोज ४ तास २ वर्षांपर्यंत,
- उच्च प्राथमिक केंद्रासाठी कालावधी दररोज ६ तास ३ वर्षांपर्यंत.

### स्वयंसेवक :-

किमान १८ वर्षे वय पूर्ण, स्थानिक, १२ वी उत्तीर्ण, डी.एड्. महिलांना प्राधान्य.

### मूळ शैक्षणिक प्रवाहात दाखल करणे :-

- प्राथमिक - दोन वर्षानंतर परीक्षा घेऊन मुख्य प्रवाहात आणता येते,
- उच्च प्राथमिक - केंद्राचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्राचे आधारावर कोणत्याही माध्यमिक शाळेत इ. ८ वी मध्ये प्रवेश घेता येईल.

## महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्र (हंगामी स्थलांतरित)

### उद्दिष्टे :-

- हंगामी स्थलांतर करणाऱ्या पालकांच्या मुलांकरिता प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करणे,
- स्थलांतरीत पालकांच्या ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना पालकांच्या कामाच्या ठिकाणी शिक्षणाची संधी देणे,
- स्थलांतर करणाऱ्या पालकांच्या मुलांच्या सोयीनुसार शिक्षण उपलब्ध करुन देणे.

### लाभार्थी :-

- हंगामी स्थलांतरित होणाऱ्या पालकांची / कामगारांची ६ ते १४ वयोगटातील मुले,
- योजोची अंमलबजावणी :-
- प्राधान्यने शिक्षण विभाग अधिकारी,
- स्थानिक स्वराज्य संस्था,
- तर स्थानिक स्वराज्य संस्था केंद्र काढण्यास तयार नसेल व तसे लेखी दिले असेल तर पंजीकृत स्वयंसेवी संस्था तसेच पंजीकृत शिक्षण संस्था.

### विद्यार्थी संख्या :-

मुलांची संख्या किमान १५.

### कालावधी :-

- ६ महिने दररोज ४ तास,
- अपवादात्मक परिस्थिती व समर्थनीय कारण असल्यास ३ महिने दररोज ६ तास.

### स्वयंसेवक :-

किमान १८ वर्षे वय पूर्ण तसेच स्थानिक असावा. १२वी पास,डी.एड्. प्राधान्य.

### मूळ शाळेत प्रवेश :-

केंद्रावरून दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारे नियमित शाळेत दाखल करुन घेऊन त्या पुढील अभ्यासक्रम विद्यार्थी पूर्ण करेल.